महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्यातील वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत

(१) ७९२० (०७-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे पोलीस शिपायांकडे असलेले अधिकार शासनाने काढून घेतले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या विरोधात मुंबई बार आसोसिएशनने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर न्यायालयाने सदर अधिकार पुन्हा पोलिस शिपायांस द्यावेत असे आदेश शासनास दिले आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. दिवाकर रावते (३१-०८-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे आहे

(४) दिनांक २४मार्च, २०१५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मोटार अधिनियम, १९८८ कलम २०० अंतर्गत कलम १७७, १८०, १८१, १८३, १८४, १८९, १९२ अतंर्गत तडजोड शुक्ल वसूल करण्याचे अधिकार पोलीस शिपायांना दिले आहेत.

राज्यातील परिवहन कार्यालयामध्ये येणाऱ्या नागरिकांना सेवा देण्याबाबत

(२) १०५३९ (०४-०४-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील परिवहन कार्यालयांमध्ये दलालांना नो ऐंट्री केल्याने परिवहन कार्यालये दलाल मुक्त झाली असतील तर परिवहन कार्यालयात येणा-या नागरीकांना त्वरीत सेवा मिळण्यासाठी काय पर्यायी उपाय योजना केली आहे, व केली असल्यास ती फलद्रुप झाली आहे काय,
(२) असल्यास, दलांलाकडून नागरीक, पत्रकार, ग्राहक यांचेमध्ये दहशत निर्माण केली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिवहन कार्यालयात येणा-या नागरीकांना सेवा देण्यासाठी शासनाच्या महसूल विभागाप्रमाणेच सेतु सूविधा केंद्र निर्माण करुन सर्व संबंधित ग्राहकांना सेवा दिल्या आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त सेवा देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (३१-०८-२०१८) : (१) नागरिकांना त्यांच्या कामासाठी मध्यस्थांकडे जाण्याची गरज पडू नये यादृष्टीने मार्गदर्शन कक्ष, एक खिडकी योजना, ऑनलाईन अपॉईटन्मेट, ऑनलाईन फॉम्स व कार्यपध्दतीने माहिती या सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत. तसेच कार्यालयात माहिती फलक देखील लावण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) कार्यालयाच्या प्रवेशाच्या ठिकाणी नागरिकांना कामकाजाची माहिती मिळण्याच्या दृष्टीने एक मार्गदर्शक कक्ष निष्णात कर्मचाऱ्याच्या अधिपत्याखाली निर्माण करुन विना मध्यस्थ सुलभ कार्यप्रणाली योजना कार्यालयाने दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ च्या पत्रान्वये सुचना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

प्रादेशिक परिवहन कार्यालयात शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणी करिता येणाऱ्या महिलांना बसण्याची व्यवस्था करण्याबाबत

(३) १४९१६ (०७-०४-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रादेशिक परिवहन कार्यालयात कामासाठी येणा-या महिलांना शिकाऊ परवाना काढण्यासाठी चाचणीसाठी रांगेत प्रतिक्षा करावी लागत असल्यामुळे महिलांना होणारा त्रास टाळण्यासाठी महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी अशी सूचना परिवहन आयुक्त कार्यालयाने दिली असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१५ वा रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिलांसाठी टॅक्सी रिक्षा अशी सार्वजनिक वाहने चालविण्यासाठी परवाने व बॅचेसची मागणी अनेक वर्षापासून महिला व मुलींना स्वयंरोजगार करण्यासाठी मागणी होत आहे, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, महिला सक्षमीकरणासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली, अथवा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (३१-०८-२०१८) : (१) मा.मंत्री (परिवहन) यांच्या दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्रातील सुचनेनुसार प्रादेशिक परिवहन कार्यालयात शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणीकरिता येणाऱ्या महिलांना सध्याच्या व्यवस्थेमध्ये वेगळी बसण्याची व्यवस्था करावी, महिलांना प्राधान्य देण्यात यावेअशा सुचना दिनांक ३१ जानेवारी, २०१५ च्या पत्रानुसार परिवहन आयुक्त कार्यालयाने सर्व घटक कार्यालय प्रमुखांना देण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे आहे

(३) नुतनीकरण न झालेल्या ऑटोरिक्षा परवान्यांचे फेरवाटप करताना मुंबई व इतर काही महानगरपालिका क्षेत्रात सन-२०१६ मध्ये ५% परवाने महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहेत. पुरेक्षा प्रमाणात महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास सदर महिलांसाठीचे आरक्षीत परवाने राखुन ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव जिल्ह्यातील अडावद गोरगांवले (ता.चोपडा) व यावल सर्कल (ता.यावल) येथील शेतकऱ्यांच्या केळी बागांचे झालेले नुकसान

(४) ३५४४७ (२०-०१-२०१६). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील अडावद गोरगांवले (ता.चोपडा) व यावल सर्कल (ता.यावल) येथील शेतक-यांच्या सन २०१२ मध्ये केळी बागांच्या झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्कलमधील शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०१-०९-२०१८) : (१) खरे नाही. हवामान आधारित पीक विमा योजनेच्या तरतुदीनुसार सन २०१२-१३ मध्ये जळगांव जिल्हयातील चोपडा तालुक्यातील अडावद,गोरगांवले आणि यावल तालुक्यातील यावल सर्कल मधील स्वयंचलीत हवामन केंद्रे विमा संरक्षित कालावधीत चालू स्थितीत होती, सदर हवामान केद्रांची आकडेवारी प्राप्त झाली आहे.

स्वयंचलित हवामान केंद्राकडून प्राप्त आकडेवारीनुसार योजनेत सहभागी झालेल्या एकूण १८३३ शेतकऱ्यांपैकी शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार पात्र ठरलेल्या ६०५ शेतकऱ्यांना रु.६,८९८,५०००/- नुकसान भरपाईची रक्कम बँकेमार्फत त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेली आहे.

(२), (३), (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात "हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना" राबविण्याबाबत

(५) ५१५०० (१५-०५-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबात कायमस्वरुपी चरितार्थाचे साधन उपलब्ध होण्यासाठी राज्यात "हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना" राबविण्याचा निर्णय दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबात कायमस्वरुपी चरितार्थाचे साधन उपलब्ध होण्यासाठी राज्यात "हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना" राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१९-०९-२०१८) : (१) हे खरे आहे.

दि.२१ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवासाठी नियमित उत्पनाचे साधन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने "विशेष बाब" म्हणून विधवांच्या नावे ऑटोरिक्षा परवाना वितरित करण्यास "हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना" सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(२) सदरहू योजनेचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे:-

१) ऑटोरिक्षा परवाना जारी करताना परवानाधारकाकडे बॅज व लायसन्स असणे आवश्यक आहे. तथापि या योजनेमध्ये शेतकऱ्यांच्या विधवांसाठी या अटीमधून सूट देण्यात आली आहे.

२) सदर ऑटोरिक्षा स्थानिक प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या इंधनावर चालणाऱ्या राहतील.

३) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबास शासनाने दिलेल्या रु.१.०० लक्ष सानुग्रह अनुदानापैकी पोस्ट/बॅकेच्या मासिक प्राप्ती योजनेमध्ये जमा असलेली सत्तर हजार रुपयांची ठेव रक्कम बॅकेकडुन कर्जपुरवठा घेताना सदर लाभार्थी कर्जासाठी हमी म्हणून वापरू शकतील.

४) सदर योजनेव्दारे विधवा महिलांना परवाना वितरीत केल्यानंतर त्याबाबतचे पालकत्व संबंधित स्थानिक प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे राहील.

५) महसूल व वन विभागाच्या दि.१९.१२.२००५ व दि. २२.०१.२००६ च्या शासन निर्णयान्वये रु. १.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आले व त्यासाठी ते पात्र ठरविले आहे, अशाच शेतकऱ्यांच्या विधवा हया ऑटोरिक्षा परवाना मिळण्यासाठी पात्र आहेत.

६) सदर योजना ही दि.२१ जानेवारी, २०१६ पासून सुरु करण्यात आली असून या दिनांकापूर्वी शासनाने पात्र लाभार्थी म्हणून घोषित केलेल्या कुटुंबास ही योजना लागू करण्यात आलेली आहे.

(३) व (४) दि.२१.०१.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष बाब म्हणून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा महिलांना ऑटोरिक्षा परवाने जारी करण्याची कार्यवाही करण्यात येते.

सदर योजनेखाली राज्यात एकुण १०६१ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ७४१ जणांना इरादापत्र व ३८२ ऑटोरिक्षा परवाने देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील प्रत्येक प्रादेशिक कार्यालयात (आरटीओ) येथे टेस्टिंग ट्रॅक उभारणेबाबत

(६) ६५२९० (१८-०५-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बस गाड्यासह अवजड वाहनांची चाचणी करून त्यांना फिटनेस प्रमाणपत्र देण्यासाठी प्रादेशिक कार्यालयाला किमान अडीचशे फुट लांबीचे टेस्टिंग ट्रॅक उभारण्याचे निर्देश मा. उच्च न्यायालयाने शासनास देऊन अद्याप टेस्टिंग ट्रॅक उभारण्यात आले नाहीत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती राज्यातील प्रत्येक प्रादेशिक कार्यालयात टेस्टिंग ट्रॅक उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (३१-०८-२०१८) : (१), (२) व (३) प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये २५० मी. लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारणीची बाब कार्यवाहीखाली असुन २८ ठिकाणी निविदा सुध्दा मागविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवा मोढा (जि.नांदेड) येथील बियाणांची जादा दराने विक्री केल्याबाबत

(७) ८०७३५ (१४-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवा मोढा (जि.नांदेड) येथील शेतक-यांना सँपल म्हणून मोफत देण्यात येणा-या संकरीत ज्वारीच्या बियाणांची जादा दराने विक्री करणा-या कृषि केंद्रावर कृषि विभागाने दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास छापा टाकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या छापेत किती बियाणे जप्त करण्यात आला आहे,

(३) असल्यास, यावेळी किती जणांना अटक करण्यात आली व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०३-१०-२०१८) : (१) नवा मोंढा (जि.नांदेड) येथे न्युजिविडू बियाणे कंपनीचे विक्रीसाठी नसलेले (Not for Sale) बियाणे विनापावती विक्री होत असल्याची तक्रार दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी प्राप्त झालेली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने कृषि अधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांच्याकडून मे. व्यंकटेश कृषि भंडार, नवा मोंढा, नांदेड या बियाणे विक्री केंद्राची तपासणी करण्यात आलेली आहे.

(२) सदर तपासणी दरम्यान मे. व्यंकटेश कृषि भंडार, नवा मोंढा, नांदेड या बियाणे विक्री केंद्रावर न्युजिविडू बियाणे कंपनीचे विक्रीसाठी नसलेले एकूण १८० पाकीटे (३ किलो प्रति पाकीट) प्राप्त झाल्याचे आढळून आले. त्यापैकी शिल्लक असलेली १४४ पाकीटे जप्त करण्यात आलेली आहेत.

(३) मे. व्यंकटेश कृषि भंडार, नवा मोंढा, नांदेड या बियाणे विक्री केंद्राचा बियाणे विक्री परवाना निलंबीत करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे राहेरा (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील प्रकल्प पुनर्वसन समित्यांचे कामकाज प्रलंबित असल्याबाबत

(८) ९०५६० (१५-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयासह राज्यातील इतर जिल्हयात प्रकल्पनिहाय पुनर्वसन समित्या स्थापन करण्याचे शासनाचे धोरण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे राहेरा (ता. मोताळा, जि. बुलडाणा) येथील प्रकल्पासाठी दिनांक २४ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास प्रकल्प पुनर्वसन समिती स्थापन करण्यात आली आहे, हे हीखरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीच्या नियमित बैठका होत नसुन झालेल्या बैठकांमध्ये समाविष्ट असलेल्या सदस्यांची मते, प्रकल्पाच्या दृष्टीने सुचना विचारात घेतल्या जात नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०९-२०१८) : (१) होय.

भुमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ४५ नुसार प्रकल्प पुनर्वसन व पुनर्वसाहत समिती गठीत करण्याची तरतुद आहे.
(२), (३), (४) व (५) हे अंशत: खरे आहे.
राहेरा लघु पाटबंधारे योजना या प्रकल्पामुळे बाधित होणा-या व्यक्तींचे पुनर्वसन विषयक समस्यांचा आढावा व निराकरण करण्यासाठी भुमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम ४५ नुसार प्रकल्प पुनर्वसन व पुनर्वसाहत समिती गठीत करण्यात आली. तथापि पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम ११(१) अन्वये राहेरा लघु पाटबंधारे प्रकल्पाची अधिसुचना दि.१९.०९.२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आली असल्याने नविन भूसंपादन अधिनियम २०१३ च्या तरतुदी या प्रकल्पास लागु नाही. सदर समितीने प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रामध्ये वास्तव्य करणा-या रहिवाश्यांच्या पुनर्वसन विषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी केलेल्या सुचना विचाराधीन असुन नियमानुसार कार्यवाही चालु आहे.

वैनगंगा (जि.भंडारा) नदीच्या प्रवाहात वाहून जाणाऱ्या सुपीक शेतजमिनीचे मोबदला मिळण्याबाबत

(९) ९४३८४ (१६-०८-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैनगंगा (जि.भंडारा) नदीच्या पात्रात पुराने वाहून जाणाऱ्या शेकडो एकर सुपीक शेतजमिनीचे मोबदला मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनीधीनी मा.महसुल मंत्री यांना माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैनगंगा (जि.भंडारा) नदीच्या पात्रात पुराने वाहून जाणाऱ्या शेकडो एकर सुपीक शेतजमिनीचा मोबदला मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१८) : (१) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही.
(२) जून ते सप्टेंबर २०१३ मधील अतिवृष्टी व पुरामुळे तुमसर तालुक्यातील रेंगेपार, पांजरा, कोष्टी, बोरी व उमरवाडा गावामधील वैनगंगा नदीच्या पात्रात शेतजमीन वाहून गेलेल्या ९८ खातेदारांना रु. २,९९,१३३/- इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा क्र.३ करीता संपादित केलेल्या जमिनधारकांच्या पुनवर्सनाबाबत

(१०) ९५१०१ (२९-१२-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा क्र.३ करीता संपादित केलेल्या जमिनधारकांचे पुनवर्सन करण्यास शासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जलविद्युत प्रकल्पात भुमीहीन होवून नोकरी निमित्ताने ठाणे जिल्हयात स्थायिक झालेल्या प्रकल्पग्रस्तांनी मोबदल्यात ठाणे कोलशेत,शहापूर व भिवंडी येथील शासकीय जमिन मिळणेस जिल्हाधिकारी, ठाणे यांना अर्ज करूनही कोणतीही कार्यवाही केली गेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांना मुरबाड येथील मौजे-मासले येथील जमिन देण्याबाबतचा निर्णय प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या हयातीत त्यांच्या संपादित केलेल्या जमिनींच्या मोबदल्यात जमिन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०५-०९-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही. कोयना प्रकल्पातील ८०३ प्रकल्पग्रस्तांपैकी ठाणे जिल्हयातील भिवंडी, शहापूर व ठाणे तालुक्यातील १४ वसाहतीमध्ये ६६० प्रकल्पग्रस्तांचे तर पालघर जिल्हयातील वाडा तालुक्यात १४३ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. ठाणे जिल्हयातील ६६० प्रकल्पग्रस्त कुटुंबापैकी ५०७ प्रकल्पग्रस्तांचे ९ वसाहती मध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे. तर इतर ५ स्वेच्छा वसाहतीमध्ये उर्वरीत १५३ प्रकल्पग्रस्त स्वत: येऊन स्थायीक झाले आहेत. ठाणे जिल्हयातील ६६० प्रकल्पग्रस्तापैकी ४६६ प्रकल्पग्रस्तांना ७४५.४७.९ हे.आर.प्र.इतकी जमीन वाटप केली असून ५३१ प्रकल्पग्रस्तांना १९९७०८.५५ चौ.मी.इतके क्षेत्र भूखंड वाटप केले आहे.

(३) व (४) जमीन वाटप केलेल्या ४६६ प्रकल्पग्रस्तापैकी ११७ प्रकल्पग्रस्तांना मौजे-मासले, ता.मुरबाड येथील ११०६७० हे.आर.जमीन पर्यायी जमीन वाटप करण्यात आली होती, परंतू स्थानिक लोकांचा तीव्र विरोध असल्यामुळे सदर ११७ प्रकल्पग्रस्तांना जमीनीचा ताबा देण्यात आलेला नाही. प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटप करण्यासाठी ठाणे जिल्हयातील सर्व तहसिल कार्यालयाकडून वाटपासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली असता अतिक्रमण विरहीत एकसलग शासकीय जमीन उपलब्ध नसल्याबाबत सर्व तहसिलदारांनी कळविले आहे. त्यामुळे आता पालघर जिल्हयात प्रकल्पग्रस्तांना वाटपासाठी जमीन उपलब्ध करून देण्याची विनंती या विषयावर झालेल्या बैठकीमध्ये करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात वीज पडून जिवीतहानी होण्याचे प्रमाण वाढत असल्याबाबत

(११) ९६४०६ (२९-१२-२०१७). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात मागील तीन वर्षात वीज पडून ५४ जणांचा मृत्यु झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबियांना शासनाने आर्थिक मदत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात वीज पडून होणाऱ्या मृत्यु रोखण्याच्यादृष्टीने उपाययोजना सूचविण्यासाठी दिनांक ०२/२/२००८ अन्वये नेमलेल्या अभ्यासगटाने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या अभ्यासगटाने आपल्या अहवालात कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(५) असल्यास, वीज प्रवण भागात वीज अटकाव यंत्रणा प्रायोगिक तत्वावर कोणकोणत्या जिल्हयात आतापर्यंत उभारण्यात आल्या आहेत, तसेच त्याची फलनिष्पत्ती काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१८) : (१) व (२) नांदेड जिल्हयात गेल्या तीन वर्षात वीज पडून ६९ व्यक्तींचा मृत्यू झाला असल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यापैकी ६८ मृत व्यक्तींच्या वारसांना शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ अन्वये प्रत्येकी ४ लक्ष एवढी मदत देण्यात आली असून उर्वरित १ प्रकरण वारसासंबंधी न्यायप्रविष्ठ असल्याने मदतीचे वाटप करण्यात आले नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अभ्यासगटाने केलेल्या शिफारसी:-

i. जिल्हयामधील वीजप्रवण क्षेत्रामध्ये प्रायोगिक तत्वावर वीज अटकाव यंत्र बसविणे.

ii. सार्वजनिक बांधकाम विभागाने ३ मजल्यांपेक्षा जास्त उंची असलेल्या शासकीय इमारतीमध्ये यंत्र बसविणे.

iii. शालेय शिक्षण विभाग व उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शाळा व महाविद्यालयांच्या इमारतींवर वीज यंत्र बसविण्यात यावे.

iv. वीज पडत असताना काय करावे व काय करु नये याबाबत विविध माध्यमांद्वारे जनजागृति करणे

v. एखाद्या प्रदेशातील पडणाऱ्या विजेचा, त्याप्रदेशाच्या भूआकृति विज्ञानाचा आणि तेथील शास्त्राचा सविस्तर अभ्यास अत्याधुनिक साधनसामग्रीच्या मदतीने दिर्घ कालावधीसाठी करावा.

vi. सर्व संबंधित शासकीय यंत्रणेने काटेकोरपणे विजेपासून संरक्षणाबाबत दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करावी.

vii. आपत्तीच्या वेळी निर्माण केलेल्या मदत शिबिरांमध्ये वीज प्रतिरोधक यंत्र बसवावे.

viii. सर्व प्राथमिक आरोंग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयांमध्ये वीजेने जळालेल्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी पुरेशी साधनसामग्री, औषधे तसेच मनुष्यबळ उपलब्ध असावे.

ix. वीजप्रवण क्षेत्रामधील लोकांना वीजेने बाधित झालेल्या रुग्णांवर प्रथमोपचार करण्याचे प्रशिक्षण देण्यात यावे.

x. वीजेचा झटका बसलेल्या व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या व्यक्तीला किंवा त्याच्यावर उपचार करणाऱ्या व्यक्तीलासुद्धा धक्का बसू शकतो ही लोकांची गैरसमज दूर करण्यासाठी जनजागृती केली पाहीजे.

xi. वीज पडत असताना लोकांनी काय करावे व काय करु नये याबाबत जनजागृति करावी.

xii. आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषात विजेला नैसर्गिक आपत्ती म्हणून अधिकृत करण्यात यावे.

xiii. केंद्र शासनाने राष्ट्रीय विज धोके न्यूनिकरण प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय घ्यावा.

xiv. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने वीजेच्या धोक्यांवर मार्गदर्शक सूचना तयार करण्यात याव्यात.

xv. राज्यशासनाने राष्ट्रीय कृषी संशोधन परिषद, राष्ट्रीय कृषि मंत्रालय व विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे राज्यातील कृषी विद्यापीठांना संशोधन करुन राज्य शासनाला त्याबाबत निष्कर्श व शिफारसी सादर कराव्यात.

xvi. राज्य शासनामार्फत मराठवाड्यात विजेबाबत संशोधन आणि न्यूनिकरणासाठी केंद्र स्थापन करण्यात यावे.

(५) शासन निर्णय, दिनांक ०९.०५.२००८ अन्वये राज्यातील ३३ जिल्ह्यांना प्रत्येकी २ वीज अटकाव यंत्रणा बसविण्यासाठी रु. १ लाख एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

पर्ससीन मासेमारी संदर्भात महाराष्ट्र मासेमारी नियम व अधिनियम १९८१ मध्ये काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत

(१२) ९९१०६ (२७-१२-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पास्कल धनारे (डहाणू) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. सोमवंशी समितीच्या अहवालाप्रमाणे पर्ससीन मासेमारी संदर्भात महाराष्ट्र मासेमारी सागरी नियम व अधिनियम १९८१ मध्ये शासनाने माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आवश्यक बदल केले आहेत, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, महाराष्ट्र मासेमारी नियम व अधिनियम १९८१ ची काटेकोरपणे अंमलबजावणी होणेसाठी स्वतंत्र कक्ष कार्यरत करण्याची मागणी माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय.
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र मासेमारी नियम व अधिनियम १९८१ ची काटेकोरपणे अंमलबजावणी होणेसाठी स्वतंत्र कक्ष कार्यरत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०४-०९-२०१८) : (१) होय.
(२) होय.
(३) कार्यवाही सुरु आहे.
(४) कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात वीजबळीच्या घटना रोखण्यासाठी लाईटनिंग डिटेक्शन सेंसर बसविण्याबाबत

(१३) १०१९१२ (२९-१२-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मराठवाड्यात ५ तर राज्यभरात एकूण १९ ठिकाणी वीजबळीच्या घटना रोखण्यासाठी आयआयटीएम या संस्थेमार्फत लाईटनिंग डिटेक्शन सेंसर बसविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावात नेमकी कुठल्या भागात वीज पडणार आहे, ही माहिती सेंसरद्वारे प्रशासनाला आगाऊ मिळत असली तरी शेतकऱ्यापर्यंत वेळेत माहिती पोहोचवून वीजबळीमुळे त्याचा जीव वाचवू शकणारी शासनाची संबंधित यंत्रणा कार्यान्वित नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सेंसरद्वारा प्राप्त होणारी माहिती गावपातळीपर्यंत वेळेत पोहोचवून वीजबळींच्या घटना रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२४-०८-२०१८) : (१) होय.
(२), (३) व (४) या सेन्सर मार्फत विज पडणाऱ्या ठिकाणांची माहिती ३०० मीटर अंतरापर्यंत मिळू शकते. सदर पूर्व सूचना ३० ते ६० मिनिट आधी प्राप्त होऊ शकते. संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांना इंडियन इन्स्टिटयूठ ऑफ ट्रॉपिकल मेटेरिओलॉजी (IITM) ने आवश्यक इंटरनेट लिंक दिली आहे.

राज्यातील पान मळयांसाठी दर्जा, पानमळयांचा पिक वर्गात समावेश, शासनाचे आर्थीक सहाय मिळणेबाबत

(१४) १०२०४४ (२७-१२-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: बुलढाणा, जालना, औरंगाबाद, जळगांव जिल्हयातील पान मळयांसाठी दर्जा, पानमळयाचे पिक वर्गात समावेश तसेच शासनाचे आर्थिक सहाय मिळत नसल्यामुळे सिंचनाचा अभाव असल्याने पानमळे नामशेष होण्याच्या मार्गावर असुन पानमळयांच्या शेतकऱ्यांना रोजगार मिळत नसल्याचे माहे ऑक्टोंबर २०१७ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पानमळांना दर्जा मिळण्यासह, पिक वर्गात समावेश करुन शासनाकडून अर्थसहाय देण्यासह सिंचनाची व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-०८-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हयात योग्य ठिकाणी हवामान केंद्र उभारुन शेतक-यांना पीक विमा नुकसान भरपाई देण्याबाबत

(१५) १०३०७९ (२७-१२-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात हवामान आधारित केंद्र चूकीच्या ठिकाणी व चूकीच्या पध्दतीने बसविल्यामुळे मागील दोन वर्षापासून विमा नुकसान भरपाईमध्ये चूकीची नोंद घेतल्याने शेतक-यांचे नुकसान झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर केंद्र योग्य ठिकाणी बसविण्यासह पीक विम्यापासून वंचित शेतक-यांना त्यांची पीक नुकसान भरपाई विमा कंपन्याकडून मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-०८-२०१८) : (१) नाही.

नुकसान भरपाईस पात्र २०१८१ शेतक-यांची केळी पिकासाठीची एकूण नुकसान भरपाई रु.३२४८००८०.५०/- संबंधित बॅकांच्या खात्यावर दि. १०/१०/२०१६ रोजी जमा करण्यात आलेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महानंद दूध संघाच्या आर्थिक अनियमतेबाबत

(१६) १०४९८१ (०१-०४-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानंद या दुग्ध सहकारी क्षेत्रातील नोंदणीकृत शिखर संस्थेला तोट्यातून बाहेर काढण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना लेख पत्राव्दारे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दुध संघांना शासनामार्फत सबसिडी देण्यात येते तशीच महानंद दूध संघाला शासन स्तरावर मदत देण्यात येवून या संघाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी संचालक मंडळ बरखास्त करुन त्यावर प्रशासक नेमावा अशीही मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती महानंद या दूध संघाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी संचालक मंडळ बरखास्त करुन त्यावर प्रशासक नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (२८-०८-२०१८) : (१) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये असे निवेदन सन्माननीय लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री (पदुम) महोदयांना दिले होते.

(२) होय.

(३) व (४) होय. महानंद दूध संघाच्या आर्थिक अनियमिततेबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७८ व ८३ अन्वये सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांनी चौकशी केली होती. सदर चौकशीत आढळून आलेल्या अनियमिततेबाबतचे मुद्दे लक्षात घेऊन दि.०२/११/२०१५ च्या आदेशान्वये महासंघाचे सदर संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. सदर आदेशास महासंघाने मा.उच्च न्यायालयात आव्हानित केले होते. मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार संचालक मंडळाची निवडणुक घेऊन नवनिर्वाचित संचालक मंडळाने दि.०७/०४/२०१६ रोजी कार्यभार स्विकारला आहे.

तसेच दि.१३/०४/२०१८ च्या आदेशान्वये महानंद दूध संघाच्या व्यवस्थापकीय संचालक पदी भारतीय प्रशासकीय सेवा संवर्गातील अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सागरी सुरक्षा रक्षकांचे पगार प्रलंबित असल्याबाबत

(१७) १०५०४४ (१८-०४-२०१८). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवर झालेल्या २६ /११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर सागरी मार्गाच्या सुरक्षेसाठी कंत्राटी पद्धतीने नेमण्यात आलेल्या सुरक्षारक्षक व पर्यवेक्षकांचे गेल्या ६ महिन्याचे वेतन थकित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने ७ किनारपट्टीवरील जिल्ह्यांसाठी ३०५ सुरक्षा रक्षकांच्या सन २०१५ मध्ये नेमणूका केल्या असून रायगड जिल्ह्यात एकूण ६७ सुरक्षा रक्षक व त्यांच्यावर देखरेखीसाठी ५ पर्यवेक्षक अशा ७२ जणांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असुन उक्त सुरक्षा रक्षक सागरी गस्ती करिता कार्यरत असतांना त्यांना नियुक्तीनंतर देण्यात येणारा पगार माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सलग ६ महिने देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कामगार संघटनांनी मत्स्यव्यवसायमंत्री, मा.मत्स्यव्यवसाय आयुक्त, सचिव, मत्स्यव्यवसाय तसेच सहाय्यक संचालक मत्स्यव्यवसाय यांचेकडे
दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा सुमारास मागाणी केली आहे. तसेच, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्याला सुमारे ७२० किमीचा प्रदीर्घ सागरी किनारपट्टा लाभला असून या सागरी किनारपट्ट्यावर ५२५ लॅण्डिंग पॉईंट आहेत. त्यापैकी ९१ केंद्रे ही संवेदनशील म्हणून घोषित
करण्यात आले असून या केंद्रावर एकूण २७३ सुरक्षारक्षक आणि २३ पर्यवेक्षकांची माहे ऑगस्ट, २०१५ वा त्या दरम्यान मध्ये नियुक्ती करण्यात आली असून, राज्यशासनाने यासाठी सुरक्षारक्षक मंडळ स्थापन केले आहेत. व राज्याच्या सहआयुक्तांची या मंडळावर नियुक्ती करण्यात आली आहे. या मंडळात नेमण्यात आलेले सुरक्षारक्षक व पर्यवेक्षकांचे मानधन राज्याच्या मत्स्यव्यवसाय आयुक्तामार्फत करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, किनारी सुरक्षा मजबूत करण्यासाठी सागरी पोलीस ठाण्यांची निर्मिती करून त्यांच्या मदतीला गस्तीनौका, सुरक्षा जॅकेट, अत्याधुनिक यंत्रणा देणार असल्याचे सरकारने जाहिर केले होते, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, पालघर जिल्ह्यातील सातपाटी, केळवे, घोलवड, इत्यादी सात सागरी पोलिस ठाण्यात गस्ती नौकांसह अत्याधुनिक साहित्याची असून अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(७) तसेच, शासनाने चौकशी करून सागरी सुरक्षकांना प्रलंबित वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (१८-०९-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सागरी सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षक यांचे माहे फेब्रुवारी, २०१८ पर्यंतचे वेतन व मानधन अदा करण्यात आलेले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) हे खरे आहे.

राज्याच्या सागरी सुरक्षेकरिता समुद्र किनाऱ्यालगत एकूण ४४ सागरी पोलीस ठाणी कार्यरत असून सागरी गस्तीकरिता सागरी पोलीस घटकांना ६७ पोलीस नौका पुरविण्या आलेल्या आहेत.
(६) पालघर जिल्ह्यात १० सागरी पोलीस ठाणी असून सागरी गस्तीकरिता ५ वेगवान गस्ती नौका कार्यरत आहे. तसेच पालघर जिल्ह्यासाठी एकूण मंजूर ९०७ पदांपैकी ६०६ पदे कार्यरत असून उर्वरीत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.
(७) सागरी सुरक्षा रक्षकांचे सप्टेंबर, २०१८ पर्यंतचे वेतन व मानधन अदा करण्यात आले आहे.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उन्नत शेती समृद्ध शेतकरी मोहिमेंतर्गत यंत्र खरेदीबाबत

(१८) १०५६५० (०१-०४-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तालुका कृषि कार्यालयांतर्गत "उन्नत शेती-समृद्ध शेतकरी" मोहिमेअंतर्गत यंत्र खरेदीसाठी शेतक-यांनी ५०% अनुदान मंजुरीचे किती प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत कृषी अधिका-यांच्या सूचनेनुसार सावकारी अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे कर्ज काढून ज्या शेतक-यांनी माहे जुलै २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पॉवर ट्रिलर खरेदी केले, त्यांच्याकडे बँकेचे डी.डी तसेच जुलै २०१७ लागू झालेल्या जी.एस.टी. कायद्यानुसार खरेदीच्या पावत्या नसल्याने त्यांना अनुदान देण्यात आले नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास "उन्नत शेती-समृद्ध शेतकरी" या शासनाच्या कृषी मोहिमे अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्यांस ५०% प्रमाणे ५० ते ६० हजार अनुदान देण्याऐवजी फक्त १९०००/- रुपये अनुदान देण्यात आले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषि अधिका-यांनी शेतक-यांना स्वखर्चाने प्रथम पॉवर ट्रिलर खरेदी करण्याच्या दिलेल्या सूचनेनुसार ज्या माहे जून २०१७ पूर्वी पॉवर ट्रिलर खरेदी केले त्यांच्यावर बँकेचे डी.डी. व जी.एस.टी. सह खरेदी पावत्या सादर करण्याची सक्ती करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, चौकशीअंती सदर योजनेअंतर्गत या अनुदानाची रक्कम पुर्णपणे देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०५-०९-२०१८) : (१) सन २०१७-१८ या वर्षात सिंधुदूर्ग जिल्हयातील २०४३ अर्जांना पुर्व संमती देण्यात आली. त्यापैंकी ११०३ लाभार्थ्यांनी औजारे खरेदी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केले आहेत. सदर सर्व लाभार्थ्यांच्या अनुदानाची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर PFMS द्वारे जमा करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) पुर्व संमती नसतांना कृषी यंत्रे अवजारे खरेदी केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान अनुज्ञेय नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार, अनुदानाची रक्कम, योजनेंतर्गत ठरवून दिलेली टक्केवारी किंवा महत्तम अनुदान मर्यादा यापैंकी जी कमी असेल तेवढया रक्कमेचे अनुदान देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगरातील मालाड येथील मढ येथे मच्छिमार जेट्टी बांधण्याबाबत

(१९) १०६१३१ (१४-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.राधाकृष्ण विखे-

पाटील (शिर्डी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मालाड (पश्चिम) येथील मढ येथे मच्छिमार जेट्टी बांधण्यासाठी निधी उपलब्ध असतानाही शासनाने माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जेट्टीच्या कामास सुरुवात केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मढ येथे मच्छिमार जेट्टी बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (४/०९/२०१८) :(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर कामास राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत सन २०१६-१७ रु.२४.५० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली असून सध्या कोकण पदवीधर मतदासंघाची अचारसंहिता सुरु असल्याने कार्यारभ आदेश देता येत नाहीत. दि.०२/०७/२०१८ रोजी अचारसंहिता संपल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाडा जिल्हयातील केळी उत्पादकांचे होत असलेले नुकसान

(२०) १०९१७५ (०१-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील अनेक भागात थंडीची लाट सुरु असुन कमी अधिक प्रमाणात मराठवाडा जिल्हयातील अनेक ठिकाणी केळी उत्पादकांच्या केळी बागांचे नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती जास्त थंडीमुळे परिपक्व केळीत सालीखाली लालसर तांबूस रेषायुक्त डाग पडत असुन या डागामुळे केळीचे भाव पडत असल्याने शेतक-यांचे आर्थिक नुकसान टाळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१८) : (१) सदर बाब निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यात मच्छिमार जेट्टी बांधण्यास निधी उपलब्ध करून देण्याबाबत

(२१) १०९८७२ (१७-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात विविध ठिकाणी मच्छिमार जेट्टी बांधण्यासाठी एक महिन्याच्या आत मंजूरी देण्यात येऊन निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन शासनाने दिल्याचे दिनांक २२ डिसेंबर,२०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आश्वासनानुसार जिल्ह्यातील कोणकोणत्या जेट्टींना मंजूरी देण्यात आली व किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे,
(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०४-०९-२०१८) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पडक्षेत्र फळझाड लागवडीखाली आणण्याबाबत

(२२) १०९९२४ (०१-०४-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खरीप हंगामात पड क्षेत्रात दरवर्षीच्या प्रमाणापेक्षा वाढ झाल्यामुळे सदर पडक्षेत्र फळझाड लागवडीखाली आणण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती पडक्षेत्र फळबागायतीची निर्माण करण्याच्या दृष्टीने संपादित करण्यात आले आहे,
(३) असल्यास, संपादीत केलेल्या पड क्षेत्रावरील फळबागायती उत्पादनाचे प्रमाण काय आहे व त्यासाठी शेतक-यांना किती अनुदान देण्यात येत आहे व कोणकोणत्या फळांची उत्पादन केले जात आहे,
(४) असल्यास, चौकशीअंती सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खरीप हंगामात पड क्षेत्रात दरवर्षीच्या प्रमाणापेक्षा वाढ झाल्यामुळे सदर पडक्षेत्र फळझाड लागवडीखाली आणण्याचा निर्णयाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-०८-२०१८) : (१) होय खरे आहे.
(२) व (३) फळबाग लागवडीसाठी जमीन संपादित करण्यात येत नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(४) सन २०१२-१३ पासून योजना सुरू असून सन २०१७-१८ अखेर फळझाड लागवड १,१७,५३३ हेक्टर क्षेत्रावर करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद जिल्हयातील शेतक-यांना ड्रगन फ्रुटची लागवड करण्यासाठी प्रोत्साहन देण्याबाबत

(२३) ११०७२३ (०१-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण (जि.औरंगाबाद) येथील शेतकरी विठ्ठल पुंजाजी बेलोकर या शेतक-यांने आपल्या विहामांडवा येथील दिड एकर शेतात दोन हजार ड्रगन फ्रुटच्या रोपांची लागवड करुन पहिल्याच वर्षी एक टनाचे उतपादन घेतले असल्याचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ड्रॅगन फ्रुट हे फळपीक कमी पावसात तग धरुन रहाणारे मराठवाडयासारख्या प्रदेशातील शेतक-यांसाठी फायदेशीर आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, यामुळे येथील शेतक-यांना ड्रगन फ्रुटची लागवड करण्यासाठी प्रोत्साहन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१८) : (१) त्याप्रमाणे शेतकऱ्याचे म्हणणे असून त्याबाबतचा कोणताही समर्पक पुरावा संबंधीत शेतकऱ्याने उपलब्ध करुन दिला नाही.
(२) व (३) ड्रॅगन फ्रुट हे फळपीक कमी पावसात तग धरुन राहणारे मराठवाड्यासारख्या प्रदेशातील शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आहे किंवा कसे याबाबत राज्यातील कृषि विद्यापीठाकडून संशोधन शिफारस प्राप्त झालेली नाही. कृषि विद्यापीठाकडून तशी अधिकृत शिफारस प्राप्त झाल्यानंतर सदर फळपीकाच्या लागवडीस प्रोत्साहन देण्याबाबतची कार्यवाही करणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील कात्रज दुध संघाच्या मंडळाने सुमारे दिडशे कामगाराची बेकादेशीर केलेली भरती

(२४) ११२१९३ (०१-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील कात्रज दुध संघाच्या मंडळाने राज्य शासनाच्या सहकारी संस्थेच्या सहनिबंधकांनी नोकर भरतीला स्थगिती दिली असतानाही सुमारे दिडशे कामगाराची बेकादेशीर भरती माहे जुन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भरती प्रक्रीयेत संचालक मंडळाने अर्थपूर्ण हस्तक्षेप केला आहे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्च न्यायालयात याचिका दाखल असुनही कात्रज दुध संघाने कामगाराची भरती केली हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती पुणे येथील कात्रज दुध संघाच्या मंडळाने सुमारे दिडशे कामगाराची बेकादेशीर भरतीस जबाबदार असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (२९-०८-२०१८) : (१) होय.

(२) अशा प्रकारची तक्रार शासनास प्राप्त नाही.

(३) होय, मा.उच्च न्यायालयात संघाने रिट याचिका क्र.८७७१/२०१६ दाखल केलेली आहे. विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) पुणे यांचेकडील दिनांक ०७.०४.२०१६ व सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) मुंबई कार्यालयाचे दि.०१.०३.२०१६ रोजीचे पत्र व शासनाचा पदुम विभागाचा दि.११.०२.२००४ चा शासन निर्णय रद्द करण्यात यावा,असे याचिकेत नमुद केलेले आहे.तथापि,मा.उच्च न्यायालयाने याबाबत अद्यापि कोणताही निर्णय दिलेला नसून सुनावणी सुरू आहे.

(४) सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी दि.२६.०२.२०१८ रोजी विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) पुणे यांनी त्रि-सदस्यीय तपासणी पथकाची नियुक्ती केली होती.

(५) तपासणी पथकाने चौकशी अहवालात पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये बेकायदेशीर नोकरभरती केल्याचे निदर्शनास आल्याने विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) पुणे यांनी पुणे जिल्हा दूध संघाच्या संचालक मंडळास दि.१६.०३.२०१८ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० चे कलम ७८(अ) अन्वये नोटीस दिली होती. तथापी सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय यांनी दि.२८/१२/१६ च्या पत्रानुसार आरक्षणाबाबत दिलेले निर्देश व मा.सर्वोच्च न्यायालय यांनी मध्य प्रदेश राज्य सहकारी बँक विरूध्द मध्य प्रदेश सरकार व इतर या सिव्हील अपीलप्रकरणी शासनाच्या मागासवर्गीय आरक्षणाच्या कायद्यामध्ये ज्या सहकारी संस्थेमध्ये शासनाचे ५१ टक्के भाग भांडवल आहे, अशाच संस्थांना सदर कायदा लागू असल्याचा निकाल दिलेला आहे.पुणे जिल्हा सहकारी दूध संघाकडे कोणत्याही प्रकारचे शासकिय भाग भांडवल सद्यस्थितीत नसल्याचे दिसून येते.या सर्व बाबींचा विचार करून पुणे जिल्हा सहकारी दूध संघास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (अ) अन्वये दि.१६/०३/२०१८ रोजी दिलेली नोटीस विभागीय उपनिबंधक,सहकारी संस्था (दुग्ध) पुणे यांनी मागे घेतली आहे.

(६) प्रश्नच उद्भवत नाही.

पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देण्याबाबत

(२५) ११२६९४ (०१-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन आणि उच्च न्यायालयाच्या पातळीवर प्रलंबित निर्णयामुळे वाहनांची योग्यता प्रमाणपत्र (पासिंग) प्रकिया रखडल्याने पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत तीन हजार वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देऊ शकलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे वाहनांची तपासणी न झाल्याने विद्यार्थीच्या जीवनाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत तीन हजार वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१२-०९-२०१८) : (१) जनहित याचिका क्र.२८/२०१३ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी सीएसआर फंडातून ब्रेक टेस्ट ट्रॅक तयार करण्यात येऊन तो दि.०९.०४.२०१८ पासून कार्यान्वित करण्यात आला आहे. प्रलंबित राहीलेल्या वाहन योग्यता प्रमाणपत्रांसाठी आवश्यकतेनूसार अतिरिक्त अधिका-यांची कर्तव्यार्थ नियुक्ती करुन तसेच सार्वजनिक सुट्टींच्या दिवशी वाहन तपासणीचे कामकाज सुरु ठेऊन प्रलंबित राहीलेल्या सुमारे तीन हजार वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्रांचे नुतनीकरण करण्यात आले आहे.

(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल येथे मार्च २०१८ अखेर शालेय विद्यार्थी वाहतूक करणा-या एकुण ११८ वाहनांची तपासणी करुन त्यांना पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी योग्यता प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

आखवणे, भौम (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) अरूणा प्रकल्प संघर्ष कृती समितीने सादर केलेल्या निवेदनातील मागण्याबाबत

(२६) ११३२१० (०१-०४-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखवणे, भौम (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) या गावातील खो-यात अरूणा पाटबंधारे धरण प्रकल्पाचे १० वर्षापूर्वी काम सुरू करण्यात आले असुन शासनाच्या विकासात्मक प्रकल्पाला

विरोध न करता आखवणे,नागपवाडी,भौम गावच्या प्रकल्पग्रस्तांनी तत्परतेने सहकार्य केले असता गेल्या १० वर्षात अरूणा प्रकल्प संघर्ष कृती समितीच्या वतीने सादर केलेल्या एकाही मागणीची शासनाने पूर्तता केलेली नाही, हे खरे आहे काय

(२) असल्यास प्रकल्प सुरू होवून १३ वर्षे पूर्ण झालेली असतानाही प्रकल्पग्रस्तांनी शासनाकडे पाठविलेल्या अर्ज विनंती प्रलंबित आहे. हेही खरे आहे काय,

(३) असल्यास सदरहू धरण प्रकल्पग्रस्तांच्या मागण्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे अलिकडेच जानेवारी २०१८ मध्ये वा त्यासुमारास प्रकल्प संघर्ष समितीने मा.पुनर्वसनमंत्री यांचेकडे एक सविस्तर निवेदन सादर केले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास सन २०१६ मध्ये राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कोकण आयुक्त, जिल्हाधिकारी,सिंधुदुर्ग व अरूणा प्रकल्पग्रस्ताचे पदाधिकारी यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत प्रकल्पग्रस्तांना सन २०१३ च्या भूसंपादन कायद्याप्रमाणे अरूणा प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यात यावी,असे स्पष्ट आदेश दिले असताना व संबंधित अधिका-यांनी सदर बैठकीमध्ये त्यास मान्यता दिलेली असतानाही उपजिल्हाधिकारी भूसंपादन, जिल्हा मुख्यालय, सिंधुदुर्ग यांनी दिनांक १४ आक्टोबर २०१७ रोजी वा त्यासुमारास१२/२ ची नोटिस काढून या नोटिस अन्वये सदरहू प्रकल्पग्रस्तांना निवाडा वाटप करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे त्यामुळे उपजिल्हाधिकारी यांचा हा निर्णय प्रकल्पग्रस्तांसाठी अन्यायकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०१३ ला लागू झालेला भूसंपादन कायदा अरूणा प्रकल्पग्रस्तांना केला जात नाही, हे अन्यायकारक आहे व चुकीचा निवाडा असल्याने तात्काळ रद्द करण्यात यावा व आताच्या बाजारभावाप्रमाणे येथील प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे मूल्यांकन करून भरपाई देण्यात यावी,अशी सदर निवेदनातून केली आहे,हेही खरे आहे काय ,

(६) असल्यास, चौकशीअंती अरूणा प्रकल्प संघर्ष कृती समितीने सादर केलेल्या निवेदनातील मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१-०९-२०१८) : (१) अरूणा प्रकल्प संघर्ष समिती यांच्या मागण्या संदर्भात अरूणा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्याप्रमाणे मांगवली, कुंभारवाडी, कुसुर, वेंगसर येथील गावठाणातील नागरी सुविधांची कामे सुमारे ९५% टक्के पूर्ण झालेली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) अरूणा प्रकल्पाच्या धरण बैठक, पुच्छ कालवा व बुडीत क्षेत्रातील एकूण ४ गावे संपादीत केली असून सन २०१० मध्ये निवाडा जाहीर होऊन मोबदला रक्कमेची वाटप प्रक्रीया ही भूसंपादन विभागाकडून पूर्ण झालेली आहे.

बुडीत क्षेत्रातील मौजे भोम, आखवणे व नागपवाडी या गावाचे भूसंपादनाचे निवाडे माहे १०/२०१२ व ११/२०१२ मध्ये जाहीर झालेले आहेत. दरम्यान भूसंपादन कायदयामध्ये बदल होवून नवीन भूसंपादन कायदा २०१३ हा ०१/०२/२०१४ पासून अंमलात आल्याने प्रकल्पग्रस्तांनी मोबदला रक्कम ही नवीन कायदयाप्रमाणे मिळावी अशी मागणी केली. भूसंपादन कायदा २०१३

हा कायदा १ जानेवारी २०१४ पासून लागू झालेला आहे. मात्र अरूणा प्रकल्पातील भोम, आखवणे, नागपावाडी मधील निवाडे तत्पूर्वीचे असून भूसंपादन अधिनियम १८९४ मधील तरतूदीनूसार घोषीत झालेले असल्याने नविन भूसंपादन कायदा लागू करता येणार नाही. प्रकल्पग्रस्तांनी मोबदला रक्कमेचे वाटप नविन कायदयाप्रमाणे न झाल्यास जाहिर झालेल्या निवाडयाची रक्कम स्विकारणार नाही अशी भूमिका घेतली आहे. तसेच संबंधित खातेदारांना कलम १२(२) ची नोटीसा बजावण्यासाठी तलाठी आखवणे यांच्यकडे पाठविण्यात आल्या होत्या. परंतू खातेदारांनी नोटिस स्विकारण्यास नाकार दिलेला होता. सदर दिवशी कोणीही खातेदार नियोजित ठिकाणी उपस्थित राहिलेले नाहीत. त्यामुळे खातेदारांना मोबदला अदा करता आलेला नाही.

(३) निवेदन सादर केले आहे.

(४) सदर बैठकीमध्ये नविन पुनर्वसन अधिनियम लागू करण्याबाबत तपासून कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश दिले होते त्यानुसार ७१ व्या नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये नव्या भूसंपादन कायदयाप्रमाणे येणारी वाढीव मोबदला रक्कम-नि-सानुग्रह अनुदान म्हणून मान्यता दिली आहे.

(५) भूसंपादन कायदा २०१३ हा कायदा १ जानेवारी २०१४ पासून लागू झालेला आहे. मात्र अरूणा प्रकल्पातील भोम, आखवणे, नागपावाडी मधील निवाडे तत्पूर्वीचे असून भूसंपादन अधिनियम १८९४ मधील तरतूदीनूसार घोषीत झालेले असल्याने नविन भूसंपादन कायदा लागू करता येणार नाही.

(६) नविन भूसंपादन कायदा २०१३ च्या मागणीबाबत दिनांक ३१/०१/२०१८ रोजी ७१ व्या नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये नव्या भूसंपादन कायदयाप्रमाणे येणा-या वाढीव मोबदला रक्कम-नि-सानुग्रह अनुदान म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना २०१३ च्या भूसंपादन कायदयाप्रमाणे जमिनीचे मुल्यांकन व इतर बाबी मिळणार आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

मौजा नमस्कारी (ता.तिवसा, जि.अमरावती) या गावातील पुरग्रस्तांचे पुर्नवसन रद्द करणेबाबत

(२७) ११५६५२ (०४-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा नमस्कारी (ता.तिवसा, जि.अमरावती) येथे सन १९९४ मधील पुरग्रस्तांना पुर्नवसनकरीता सन २००६-०८ मध्ये ज्या ठिकाणी जागा देण्यात आली ती जागा योग्य नसल्याने गावकऱ्यांनी जागा नाकारल्यामुळे पुर्नवसन झाले नसुन गावात सर्व सवलती रेड झोन मध्ये असल्यामुळे नागरिक वंचित असल्याने गावाचे पुर्नवसन रद्द करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ नोंव्हेबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिले असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती नमस्कारी गावामध्ये मुलभूत सुविधांचा अभाव निर्माण होत असल्याने गावाचे पुर्नवसन रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२७-०८-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, याबाबत तहसिलदार, तिवसा यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(३) नमस्कारी हे गाव रेड झोनमध्ये असल्यामुळे पुनर्वसन रद्द करता येणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे येथील बस स्थानकांच्या बांधकामासह दुरुस्ती करण्याबाबत

(२८) ११५७८८ (०१-०४-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या बस स्थानकाची दुरवस्था झालेली असून त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सदर बस स्थानकाचे बांधकाम व दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) : (१) नाही.
राज्य परिवहन महामंडळाचे धुळे शहरातील मध्यवर्ती बसस्थानक सुस्थितीत असून, सदर बसस्थानकाच्या दुरुस्तीचे काम सन २०१५-१६ मध्ये करण्यात आलेले आहे. या ठिकाणी सन २०१५ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या स्थानिक विकास निधीतून २ प्रवासी शेड बांधून देण्यात आले आहेत. त्यामुळे बसस्थानकावर पूर्वीचे १२ व नवीन १० असे एकूण २२ फलाट प्रवाशांसाठी उपलब्ध करुन दिले आहेत. तसेच, वाहनतळावरील खड्डे भरण्यासाठी डांबरीकरण करण्यात आले आहे. बसस्थानकावर उपहारगृह, चौकशी कक्ष, पोलिस चौकी, वाणिज्य आस्थापना, प्रतिक्षालय, सुलभ प्रसाधनगृह इ. सुविधा उपलब्ध आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कृषी महाविद्यालये बंद करण्यात येणार असल्याबाबत

(२९) ११५९४३ (०१-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तरुणांना शेतीविषयक शिक्षण देवून त्यांना आधुनिक शेती करण्यासाठी लागणारे आधुनिक व तांत्रिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने दीडशेपेक्षा जास्त महाविद्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सत्तावन महाविद्यालये विविध कारणांमुळे बंद करण्यात येणार असल्याचे दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यसरकार शेती व शेतकऱ्यांसाठी नवनवीन योजना सुरु करीत असून शेतीचे उत्पादन अधिकाधिक वाढविण्यासाठी प्रयत्नशील असताना शेती व्यवसायासाठी पूरक असलेली कृषी महाविद्यालये बंद करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास सदर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१४-०८-२०१८) : (१) होय.

(२) नाही हे खरे नाही.

राज्यातील १५६ कायमस्वरुपी विनाअनुदानित खाजगी कृषि व कृषी संलग्न महाविद्यालयांची तपासणी त्रयस्थ यंत्रणेकडून करण्याकरिता डॉ.एस.एन.पुरी, माजी कुलगुरु, मफुकृवि, राहुरी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. या समितीने मागील वर्षी “ड” वर्गातील १८ महाविद्यालयांची तपासणी करुन ज्या महाविद्यालयांना दोनदा “ड” दर्जा प्राप्त झालेला आहे अशा ६ महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया व ४ महाविद्यालयांच्या प्रत्येकी एका तुकडीची प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्याबाबतची शिफारस केली होती. त्या शिफारशीस अनुसरुन संबंधित कृषि विद्यापीठांनी घेतलेल्या निर्णयानुसार या महाविद्यालयांची/तुकडयांची सन २०१७-१८ ची प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती.

या प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात आलेल्या महाविद्यालयांच्या संबंधित संस्थांनी मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर येथे विविध रिट याचिका दाखल केल्या होत्या. या याचिकांबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार उक्त महाविद्यालयांमध्ये सन २०१७-१८ ची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. तसेच मा.उच्च न्यायालयाने या महाविद्यालयांना योग्य ते अभिवेदन (representation) अधिकृत यंत्रणा तसेच विद्यापीठांकडे मांडण्याची संधी देवून त्याद्वारे त्यांनी त्यांच्याकडे कोणतीही कमतरता/त्रुटी नसल्याचे तसेच सर्व पुर्तता केल्याचे सिध्द करुन दाखवावे असे आदेश दिलेले आहेत.

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे कायदा १९८३ मधील कलम ४२, ४३, ४४ नुसार महाविद्यालयांची तपासणी करणे, संलग्नता काढून घेणे इ. अधिकार कृषि विद्यापीठांना देण्यात आलेले आहेत. त्यानुसार उक्त प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे विद्यापीठाने आवश्यक ती कार्यवाही करुन अंतिम निर्णय मा.उच्च न्यायालयापुढे मांडण्याबाबत संबंधित कृषि विद्यापीठांना कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मोहोळ (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथे नवीन बसस्थानक व आगार बांधण्याबाबत

(३०) ११६१९८ (०१-०४-२०१८). श्री.रमेश कदम (मोहोळ) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ (ता.मोहोळ, जि.सोलापूर) शहरातील राज्य परिवहन मंडळाचे बसस्थानक हे जीर्ण झालेले असल्याने व सुविधा नसल्याने त्याठिकाणी नवीन बसस्थानक व आगार बांधण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन मंत्री, यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती मोहोळ (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथे नवीन बसस्थानक व आगार बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१३-०६-२०१८) : (१) सदरचे बसस्थानक हे सन २०१४ साली नव्याने बांधणेत आले असून, बसस्थानकामध्ये प्रवाशांसाठी ३ गाळे उपलब्ध असून, उपहारगृह, कंट्रोल रुम, चालक/वाहक विश्रांतीगृह, प्रसाधनगृह व पिण्याच्या पाण्याची सोय आहे. बसस्थानकाचे सन २०१६ मध्ये डांबरीकरण करणेत आले असून, पार्किंग व्यवस्था सुस्थितीत आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी पूर्व येथे एस.टी. पिकअप शेड बांधण्याबाबत

(३१) ११६२१२ (०१-०४-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी पूर्व मतदार संघातील एस.टी. पिकअप शेड प्राधान्याने मंजूर करणेबाबत दिनांक १३ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.परिवहन मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी पूर्व मतदार संघातील एस.टी. पिकअप शेड प्राबांधण्याबाबत निधी मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१८) : (१) व (२) भिवंडी पूर्व येथील २२ पिकअपशेड बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१३.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली आहे.

रस्ता हद्दीमध्ये नवीन प्रवासी निवाऱ्यांचे बांधकाम करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळास स्वनिधीमधून निधी उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करुन घ्यावा अथवा जाहिरातीच्या माध्यमातून एखादी संस्था प्रवासी निवारे बांधून देण्यास तयार झाल्यास संबंधित रस्ता प्राधिकरणाकडून परवानगी प्राप्त करुन प्रवासीनिवारे उभारण्याबाबतची कार्यवाही करण्याच्या सूचना शासनाने राज्य परिवहन महामंडळास दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य परिवहन महामंडळातील अधिकारी / कर्मचारी अनधिकृतरित्या, व्यवहार करित असल्याबाबत

(३२) ११६२१४ (०४-०४-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटीतील कर्मचा-यांच्या आर्थिक परिस्थितीचा गैरफायदा घेऊन अनधिकृतपणे खासगी सावकारी एसटीतील काही अधिकारी व कर्मचारीकरित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी सावकारी व्यवसाय करणा-या एसटीतील अधिकारी/कर्मचा-यांच्यावर कारवाई करावी असे निर्देश मा.परिवहन मंत्री महोदयांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती खाजगी सावकारी व्यवसाय करणा-या एसटीतील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) : (१) नाही.

(२) होय.

प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून राज्य परिवहन महामंडळाद्वारे दि.०९/०२/२०१८ रोजी परिपत्रक काढण्यात आलेले असून, सदर परिपत्रकानुसार महामंडळातील अधिकारी/कर्मचारी हे बेकायदेशीरपणे अनधिकृतरित्या व्याजाने पैसे देणे/घेण्याचे व्यवहार करत असल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुळगाव तांडा (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) या गावास गावठाण घोषित करण्याबाबत

(३३) ११६३०२ (२७-०३-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळगांव तांडा (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) या गावास गावठाण घोषीत करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांच्याकडून जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे वांरवार निवेदनाद्वारे मागणी करण्यात येवूनही अदयापी सदरहू गावास गावठाण घोषीत करण्यात आले नसल्याचे माहे फेबुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करून सदरहू गावास गावठाण घोषीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (७-०८-२०१८) : (१) हे खरे नाही. मौजे मुळगांव तांडा, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर या गावास जिल्हाधिकारी सोलापूर यांनी दि.०१/०२/२०१८ च्या अधिसूचनेनुसार गावठाण जाहिर केले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पाळीव जनावरांना टॅगिंग करण्याबाबत

(३४) ११६३४९ (०१-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पाळीव जनावरांना आधार क्रमांकाचे टॅगिंग करून त्याची माहिती संकलित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने एकूण किती जनावरे आधार टयागिंग करून त्यांची माहिती उपलब्ध झाली आहे तसेच राज्यातील संपूर्ण जनावरांचे आधार टयागिंग करण्यासाठी येत असलेल्या इंटरनेट सुविधा,खराब मशीन,संगणक उपलब्धतता नसल्यामुळे शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास राज्यातील संपूर्ण जनावरांची माहिती आधार क्रमांकाने टयागिंग करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

श्री. महादेव जानकर (३०-०७-२०१८) : (१) होय.
(२) राष्ट्रीय पशु उत्पादकता अभियान- पशुसंजीवनी या कार्यक्रमांतर्गत राज्यातील ५४ लक्ष दुधातील जनावरांना टॅगिंग करण्याचे लक्ष केंद्र शासनाने दिलेले असून, प्रति महिना ४.५ लक्ष जनावरे या प्रमाणे हा कार्यक्रम एक वर्ष कालावधीत महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ यांच्यामार्फत राबविण्याचा आहे.

राज्यातील ३४ जिल्हयांसाठी २२ लक्ष इयर टॅग्ज व ४८६१ टॅग ॲप्लिकेटर पुरवठा करण्याचे आदेश मे.मास ट्रान्सफर इंडस्ट्रीज, मुंबई यांना दि.२.०३.२०१७ रोजी देण्यात आले होते. पुरवठा आदेश देण्यापूर्वी टॅग व ॲप्लिकेटरची कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे या संस्थेकडून तपासणी करून घेण्यात आलेली होती.

पशुसंवर्धन विभागाकडे सद्यस्थितीत ११८८ संगणक व लॅपटॉप उपलब्ध असून सदर ठिकाणी इंटरनेटची सुविधा उपलब्ध आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार एकूण ४,८६१ नवीन टॅबलेट खरेदीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

दि.९.०४.२०१८ पर्यंत राज्यातील एकूण ४,८३,४२१ जनावरांना टॅगिंग करून त्यांची ऑनलाईन नोंदणी करण्यात आलेली आहे.

(३) राज्यातील ५४ लक्षपैकी उर्वरित जनावरांना टॅगिंग करण्यासाठी किमान एक वर्षाचा कालावधी लागणार आहे.

भिवंडी येथिल पिंपळास फाटा येथे नारायणगाव-आळेफाटा-मुंबई बसचा झालेला अपघात

(३५) ११६४२९ (०१-०४-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नारायणगाव-आळेफाटा-मुंबई ही एस.टी.बस पुढे जात असलेल्या टँकरवर आदळून पिंपळास फाटा(कोनगांव) येथे दिनांक १७ जानेवारी २०१८ रोजी वा त्यासुमारास अपघात झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा अपघात होण्याची कारणे काय आहेत व या अपघातात किती जण जखमी झाले,

(३) असल्यास, जखमी व्यक्तींना वाहक चालक यांनी कोणत्याही प्रकारची वैद्यकीय सेवा न देता अपघाताची जबाबदारी टाळण्यासाठी पुढील एसटी गाडीत बसवून दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जखमी व्यक्तींना घरी गेल्यानंतर नाईलाजाने स्वत:च्या खर्चाने तातडीने उपचार करुन घेण्यासाठी खाजगी दवाखान्यात जावे लागले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जखमी व्यक्तींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) : (१) होय.

दि.१७.०१.२०१८ रोजी नारायणगांव आगाराची बस क्र.एमएच-१४ बीटी-४०९२ ही नाराणगाव-मुंबई मार्गावर धावत असताना पिंपळास फाटा भिवंडी येथे अपघात झाला.

(२) व (३) राज्य परिवहन बसच्या पुढे धावणारे त्रयस्थ वाहन क्र.एमएच-०४-जेएफ४३४० या ट्रकने अचानक ब्रेक मारल्याने राज्य परिवहन बस या ट्रकला पाठीमागून धडकली. त्याच वेळेस बसच्या पाठीमागून येणारे त्रयस्थ वाहन टाटा आर्या कार क्र.एमएच-१५-ईई-१११८ ही राज्य परिवहन बसला पाठीमागून धडकून गंभीर स्वरुपाचा अपघात झालेला आहे.

अपघाताच्या वेळी बसमध्ये ९ प्रवाशी प्रवास करत होते. यापैकी श्रीमती सिमा प्रविण बेलवटे, वय ३४ यांच्या तोंडाला मार लागून रक्तस्त्राव झाला व त्यांचा एक दात तुटून २ दातांना गंभीर इजा झाली. बसमधील इतर प्रवाशांना व चालक/वाहक यांना कोणतीही दुखापत झाली नाही.

जखमी श्रीमती सिमा प्रविण बेलवटे ही महिला प्रवासी वगळता इतर कोणताही प्रवासी जखमी न झाल्याने चालक/वाहक यांनी मार्गावरील इतर बसमधून या प्रवाशांना पुढे प्रवासासाठी मार्गस्थ केले.

(४) व (५) श्रीमती सिमा प्रविण बेलवटे हया घटनास्थळाहून परस्पर दुसऱ्या वाहनातून निघून गेल्याने त्यांना घटनास्थळी तात्कालिक आर्थिक मदत देता आली नाही.

जखमी प्रवासी सिमा प्रविण बेलवटे यांनी गोरेगांव, मुंबई येथे उपचार घेतले असून, त्यांनी पी फॉर्मद्वारे दि.०५.०३.२०१८ रोजी वैदयकिय उपचारापोटी रु.१९,०००/- नुकसान भरपाई प्रकरण सादर केले होते. त्यानुसार राज्य परिवहन पुणे विभागाकडून अपघात नुकसान भरपाई रक्कम रु.१९,०००/- दि.१९.०२.२०१८ रोजी धनादेश क्र.२५००८३ अन्वये श्रीमती बेलवटे यांचे बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्र.६८०२५१७२०७९ वर अदा करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना पिकांच्या विम्याची रक्कम मिळण्याबाबत

(३६) ११७१९८ (३१-०७-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पिक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना पिकाच्या विमाची रक्कम देण्यास नकार दिल्याचे माहे मे २०१८ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ६३ हजार शेतकऱ्यांनी पीक विमा काढला असुन फक्त ३ हजार शेतकऱ्यांना पीक विमाची रक्कम मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचा लाभ मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२४-०८-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०१७ अंतर्गत राज्यातील ८४.५६ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेतला आहे. विमा कंपन्यांमार्फत प्राप्त अंतरिम अहवालानुसार ४६.४७ लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून रक्कम रु. २५०९.२९ कोटी नुकसान भरपाई निश्चित करण्यात आलेली आहे. त्यापैकी ४४.२० लाख शेतकऱ्यांना रु.२३८५.४४ कोटी (९५ टक्के) इतकी नुकसान भरपाई रक्कम वाटप करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वरळी येथील पावसामुळे नागरिकांच्या मालमत्ता व वित्त हानीची नुकसान भरपाई मिळण्याबाबत

(३७) ११७६१८ (०१-०८-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये दिनांक २९ ऑगस्ट २०१७ रोजी वा त्यासुमारास सकाळी ८.३० ते दुपारी २.३० या सहा तासांच्या कालावधीत मुंबईतील कुलाबा वेधशाळेत १५१ मीमी पावसाची नोंद झाली असून भारतीय हवामान खात्याच्या नोंदीनुसार दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजीचा पाऊस हा एका दिवसात पडलेला सर्वात जास्त पाऊस होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरळीसह परळ, हिंदमाता, लालबाग, दादर, जी.टी.बी. नगर, सायन, मुलुंड येथील सखल भागात या पावसाचे साठलेले पाणी नागरिकांच्या घरांत, दुकानांत गेल्यामुळे नुकसान झाले, तसेच मुंबईत ५ नागरिकांचे बळी गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरळी येथे पावसामुळे नुकसानग्रस्त झालेल्या नागरिकांच्या नुकसानीचे पंचनामे मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाने केलेले असून संबधित नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पावसामुळे झालेल्या मालमत्ता व वित्त हानीची नुकसान भरपाई नुकसानग्रस्तांना तातडीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१८) : (१), (२), (३) व (४) मुंबईतील कुलाबा वेधशाळेत पावसाच्या झालेल्या नोंदीनुसार दिनांक २९ ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी ८.३० ते दिनांक ३० ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी ८.३० पर्यंत मुंबई शहर जिल्ह्यात १११.०० मी.मी. पावसाची नोंद झाल्याचे निदर्शनास आले.

सदर पावसामुळे बाधित झालेल्या मुंबई शहर जिल्ह्यातील १५६९ कुटुंबांचे पंचनामे करण्यात आले. तथापि, शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार मदत अनुज्ञेय नसल्याने बाधित कुटुंबांना मदत वाटप करण्यात आलेली नाही. तसेच सदर पावसामध्ये ०२ व्यक्तींचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले. त्यापैकी एका मृत व्यक्तीच्या वारसांना शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार रु. ४ लक्ष एवढी मदत देण्यात आली असून, उर्वरित एका मृत व्यक्तीच्या वारसांनी मदत घेण्यास नकार दिल्याने सदर रक्कम शासनजमा करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कुपोषण निर्मुलनासाठी शिधापत्रिकेवर दुध पावडर उपलब्ध करण्याबाबत

(३८) ११७८४९ (२३-०७-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुपोषण निर्मुलनासाठी शासनाने शिधापत्रिकेवर दुध पावडर उपलब्ध करून दिल्यास शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य भाव मिळण्यासह कुपोषण निर्मुलन होण्यास मदत होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य भाव मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (२९-०८-२०१८) : (१) होय.
(२) शासनाने विविध विभागाच्या पोषण आहाराअंतर्गत दूध/दूध भुकटीचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याशिवाय राज्यातील सहकारी व खाजगी क्षेत्रातील संस्थांचा दुधापैकी पिशवीबंद दूध वगळता उर्वरित रुपांतरीत होणाऱ्या दूधास रु. ५/- प्र.लि. अनूदान दि. २० जुलै, २०१८ व ३१ जुलै, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. सदर अनुदान सहकारी व खाजगी संस्था यांना देण्यात येणार असून सदर संस्थांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना ३.५ % फॅट व ८.५ % एसएनएफ या गुणप्रतीच्या दूधाकरीता रु.२५/- प्र.लि.असे दूध खरेदी दर देण्याचे बंधन घालण्यात आले आहे. दि. १ ऑगस्ट,२०१८ पासून सदर योजना कार्यान्वीत झाली आहे. याशिवाय दूध भुकटीच्या प्रती किलो निर्यातीस रु. ५०/- असे अनूदानसुध्दा शासनाने उपरोक्त शासन निर्णयान्वये घोषित केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगरातील मालाड (पश्चिम) येथील तलपशा बंदरातील मागण्यांबाबत

(३९) ११८११३ (२३-०७-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील मालाड (पश्चिम) तलपशा बंदरावरील रस्ता रुंद करणे, जेट्टी रुंद करणे अशा विविध मागण्यांसाठी स्थानिक मच्छिमार बांधवानी, मढ दर्यादी मच्छिमार सहकारी सोसायटी व स्थानिक लोकप्रतिनिधीनी आयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग यांच्याकडे दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ता रुंद व जेट्टी रुंद करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०४-०९-२०१८) : (१) होय.
(२) सदर कामास राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत शासन निर्णय दि. २३.०२.२०१७ अन्वये रू. २४.५० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामाची निविदा पुर्ण झालेली असून कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जनावरांना देण्यात येणा-या लाळ खुरकत रोगप्रतिबंधक लस खरेदीत झालेल्या गैरव्यवहार

(४०) ११८६०७ (०५-०९-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जनावरांना देण्यात येणा-या लाळ खुरकत रोगप्रतिबंधक लस खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २० एप्रिल,२०१८ रोजी वा त्यासुमारास एक सदस्यीय समिती शासनाने नेमली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार लाळ खुरकत रोगप्रतिबंधक लस खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०५-०९-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) या प्रकरणी चौकशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या एक सदस्यीय समितीचा चौकशी अहवाल दि.२५.०५.२०१८ रोजी या विभागास प्राप्त झालेला असून, समितीने निविदा प्रक्रियेत कोणतेही गंभीर दोष आढळून आले नसल्याचे निष्कर्ष नोंदविलेले आहेत. त्यामुळे संबंधित दोषीविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील कापूस पिकांवर गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावाने नुकसान झाल्याबाबत

(४१) ११९५३८ (३१-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील ६ मंडळातील कापूस पिकांचे गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावाने नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नुकसान भरपाईतुन लोणबेहळ व बोरगाव महसूल मंडळातील गावांना वगळण्यात आल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या गावांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१८) : (१) माहे नोव्हेंबर २०१७ च्या दरम्यान बोंडअळीमुळे कापूस पिकाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) बोंडअळीमुळे झालेल्या नुकसानीबाबत नुकसानभरपाई प्रक्रियेमधून लोणबेहळ व बोरगाव या महसूल मंडळातील गावांना वगळण्यात आलेले नाही.
(३) आर्णी तालुक्यातील ६ मंडळांपैकी कोणत्याही मंडळाला बोंडअळीच्या नुकसानीपासून वगळण्यात आलेले नाही. बोंडअळीच्या नुकसानीकरीता आर्णी तालुक्याकरीता पहिला हप्ता रु. ६,९६,०१,२२५/- इतका निधी वितरीत करण्यात आला असून, सदर निधीचे वाटप इंग्रजी आद्याक्षरानुसार करण्यात आलेले आहे. सदर वाटपामध्ये लोणबेहळ मंडळातील अंबोडा, चिखली ई, देऊखाडीब, कवठा बाजार तसेच बोरगांव मंडळातील अंजीना, बोंरगाव दा, बोरगांव पुंजी, दाभडी गावातील बाधित शेतकऱ्यांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

केळापूर (जि. यवतमाळ) येथे दुष्काळासह गुलाबी बोंडअळीने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

(४२) ११९७७८ (३१-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केळापूर (जि. यवतमाळ) येथे दुष्काळासह गुलाबी बोंडअळीने शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तालुक्यात २३ हजार ४२३ शेतकरी बोंडअळीने बाधीत होवून त्यांच्या नुकसानीचे पंचनामे सुद्धा झाले, त्याची नुकसान भरपाईची मागणी महसूल विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसान भरपाईची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०९-२०१८) : (१) यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर तालुक्यात सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये कापूस पिकावर बोंडअळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे ४०४१७.२४ हेक्टर क्षेत्रावरील कापसाचे ३३% पेक्षा जास्त नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आली.

(२) होय.
(३) शासन निर्णय दिनांक ०८.०५.२०१८ अन्वये, यवतमाळ जिल्ह्यात सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये कापूस पिकावर बोंडअळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे ३३% पेक्षा जास्त नुकसान होऊन बाधित झालेल्या आपदग्रस्तांना रु. ३४९१७.०७ लक्ष इतकी रक्कम ३ समान हफ्त्यांमध्ये वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर तालुक्यास पहिल्या हफ्त्यामध्ये रु. ६,७२,१८,१४४ एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला. सदर निधी तहसिलदार केळापूर यांच्याकडून बाधित शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आला आहे.

तद्नंतर शासन निर्णय दिनांक १२.०७.२०१८ अन्वये, यवतमाळ जिल्ह्यासाठी दुसऱ्या हफ्त्यापोटी रु.१३९६७.०० लक्ष एवढा निधी वितरित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अवकाळी व वादळी पावसामुळे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्याबाबत

(४३) ११९८६७ (३१-०७-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे एप्रिल, २०१८ व मे मध्ये वा त्यादरम्यान होणारा अवकाळी व वादळी पाऊस तसेच सुसाटयाच्या वा-यामुळे ग्रामीण भागातील जुन्या घरांचे पत्रे उडून जावून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत नुकसानग्रस्तांना त्यांच्या नुकसानीची पुर्नबांधणी करणेकरीता शासनाने सन १९८८ साली ६५ मि.मी पावसाची अट रद्द करुन महसूल विभागामार्फत मदत द्यावी अशी मागणी नुकसानग्रस्तांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतक-यांना शेतीतील नुकसानीसह सार्वजनिक मालमत्तेची पुर्नबांधणी करणेकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) राज्यात माहे एप्रिल, २०१८ मध्ये गारपीटीमुळे व माहे मे, २०१८ मध्ये अवेळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या व फळपिकांच्या नुकसानीबाबत संयुक्त पंचनामे करुन नुकसानीचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतचा सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना अनुक्रमे शासन पत्र दिनांक १८.४.२०१८ व दिनांक १९.६.२०१८ अन्वये देण्यात आल्या आहेत. सदर माहिती संकलित करण्याचे काम प्रगतीपथावर असून यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

परळी वै. व पाटोदा (जि.बीड) तालुक्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

(४४) १२११४४ (३१-०७-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी वै. व पाटोदा (जि.बीड) तालुक्यात माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे सुमारे ७९३.७१ हेक्टर जमीन खरडून गेल्याने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिनांक १३ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु.२,९७,६४,१२५ एवढया रकमेची नुकसान भरपाई अदा करण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी उपयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी शासनाकडे केली असल्याचे माहे मे, २०१८ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१८) : (१) व (२) माहे जुलै ते ऑक्टोबर २०१६ या कालीवधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील पाटोदा व परळी वै. या तालुक्यातील ८११.३३ हे.आर क्षेत्राच्या झालेल्या शेतीपिकाच्या नुकसानीसाठी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडून रु. ३,०४,२४,८७५/- एवढ्या निधी मागणीबाबतचा प्रस्ताव दिनांक३०.०७.२०१८ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे.

त्यानुसार माहे जुलै ते ऑक्टोबर २०१६ या कालीवधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे खरडून/वाहून गेलेल्या जमिनीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

(४५) १२२१०६ (३१-०७-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यात सन २०१८ मध्ये पावसामुळे पूर परिस्थिती निर्माण झाल्याने शेती, रस्ता, घर तसेच शेतातील विहिरीचे नुकसान झाले असुन त्यांचे पंचनामे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१८) : (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील कापूस पिकांचे लाल बोंडअळीमुळे झालेले नुकसान

(४६) १२२३७० (०१-०८-२०१८). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील निंबा व उरळ महसूली मंडळामध्ये कापूस पिकांचे लाल बोंडअळीमुळे ३३ टक्यांपेक्षा कमी नुकसान झाले परंतु नुकसान भरपाई मिळणार नसल्याचे तालुका कृषि आधिकारी यांनी जाहीर केल्यामुळे तालुक्यातील ७ मंडळातील शेतकऱ्यांनी मदतीच्या मागणीचे निवेदन दिनांक १२ मार्च २०१८ रोजी वा त्यासुमारास तहसीलदार, बाळापूर यांना दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार लाल बोंडअळीमुळे नुकसान झालेल्या सातही महसुली मंडळातील शेतकऱ्यांना मदत मिळणेकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१८) : (१) व (२) होय.
(३) अकोला जिल्हयातील बाळापूर तालुक्यात बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या नुकसानीपोटी शासन निर्णय दिनांक ०९.०५.२०१८ व दिनांक १०.०७.२०१८ अन्वये पहिल्या व दुसऱ्या हफ्त्यात एकूण रु. १४३३.६२ लक्ष एवढा निधी वितरित करण्यात आलेला आहे. तहसिलदार बाळापूर यांनी त्यापैकी १४२८.७३ लक्ष एवढा निधी तालुक्यातील इंग्रजी वर्णमालेच्या क्रमानुसार येणाऱ्या गावांतील बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला आहे. सदर गावांमध्ये निंबा व उरळ मंडळातील गावांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मंगळवेढे (जि.सोलापुर) तालुक्यात पाऊस पडल्यामुळे झालेली नुकसान भरपाई देण्याबाबत

(४७) १२२६२८ (३१-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढे (जि.सोलापुर) तालुक्यासह इतर ग्रामीण भागात दिनांक १० आक्टोंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास १७५ मि मी पाऊस पडल्यामुळे झालेली नुकसान भरपाई तसेच पडझडीचे पैसे सुमारे ८ महिन्यांपासून दिले नसल्याचे दिनांक ३० एप्रिल.२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मंगळवेढ़ा शहरातील ७ नागरिकांची घरे व ग्रामीण भागातील ब्रम्हपुरी, आंधळगाव, सिद्धापुर येथील घराची पडझड झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उपरोक्त घटनेचे पंचनामे करून महसूल प्रशासनाने मदत देण्याचे जाहिर केले परंतु अद्यापही नुकसानग्रस्ताना मदत दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नुकसानग्रस्तांना मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२४-०८-२०१८) : (१), (२), (३) व (४) दिनांक १० ऑक्टोबर २०१७ रोजी सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील मंगळवेढा व ग्रामीण भागात १७५ मि.मी. पाऊस पडल्याने, मंगळवेढा तालुक्यातील मंगळवेढा, अरळी, कात्राळ, बोराळे, लमाणतांडा व ब्रह्मपुरी या गावांमध्ये घरांची पडझड होऊन२१ आपदग्रस्तांचे नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आली.

सदर नुकसानीबाबत संबंधित मंडळ अधिकारी व गाव कामगार तलाठी यांनी केलेल्या पंचनाम्यांनुसार तहसिलदार मंगळवेढा यांनी माहे मे २०१८ मध्ये उक्त २१ आपदग्रस्तांना एकूण ५०,०००/- एवढ्या अनुदानाचे वितरण केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयातील डेअरी उद्योजकता विकास योजनेंतर्गत घेतलेल्या कर्जाच्या अनुदानबाबत

(४८) १२४४६० (३१-०७-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील डेअरी उद्योजकता विकास योजनेअंतर्गत घेतलेल्या कर्जाचे अनुदान देण्यास नाबार्डने नकार दिल्याने ३४२ शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे अनुदान दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (२९-०८-२०१८) : (१) व (२) डेअरी उद्योजकता विकास योजना ही नाबार्ड मार्फत राबविण्यात येते व त्याअंतर्गत घेतलेल्या कर्जासाठी अनुदान देणे ही बाब नाबार्डशी संबंधित आहे.

सन २०१०-१४ या कालावधीतील दुग्धव्यवसायाशी संबंधित १५ प्रकरणे नाबार्डकडून प्राप्त झाली असता आयुक्त दुग्धव्यवसाय कार्यालयाकडून त्याची पडताळणी करुन ती नाबार्डकडे परत पाठविण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सहकारी आणि खाजगी दूध संघांनी संगनमताने दुधाचे भाव कमी केल्याबाबत

(४९) १२५००८ (३१-०७-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही सहकारी आणि खाजगी दूध संघांनी संगनमताने दुधाचे भाव कमी केल्यामुळे या दूध संघाच्या मक्तेदारीस विरोध करण्यासाठी गुजरातच्या "अमूल"ला राज्यातील दूध संकलनासाठी परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित विभागाने मा.मुख्यमंत्री यांच्या मंजूरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांच्या दुधाला भाव न देणाऱ्या संबंधित दूध संघावर कारवाई करण्याबाबतचा अहवाल मा.मुख्यमंत्री आणि मा.दुग्धविकास मंत्र्यांकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दूध संघावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (१७-०९-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) जे दूध संघ शासनाने निश्चित केलेले दूध दर देत नाही, अशा एकूण ५० संघांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अ (३) नुसार संबंधित निबंधकांनी नोटीसा देवून कारवाई सुरु केलेली होती. सदर नोटींसाविरुध्द काही संघानी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या असून सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. याबाबत मा. मंत्री, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, यांना अवगत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खांबाडा (जि.चंद्रपूर) येथे पाच जनावरांचा झालेला मृत्यू

(५०) १२५०३७ (३१-०७-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खांबाडा (जि.चंद्रपूर) येथे जंगली प्राण्यांपासून संरक्षणासाठी शेतामध्ये ठेवलेले विषारी औषण थिमेट शेतक-यांनी नष्ट न केल्याने थिमेट खाऊन पाच जनावरांचा मृत्यू झाल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतक-यांना मदत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०५-०९-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली असून जनावरे मृत पावल्याबाबत कोणत्याही पशुमालकाने पशुवैद्यकीय दवाखान्यास कळविलेले नाही. तसेच, मृत जनावरे शवविच्छेदनासाठी उपलब्ध झालेली नसल्याने शवविच्छेदन करण्यात आलेले नाही.

विषबाधेने जनावरांचा मृत्यु होणे ही बाब नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्याने मृत जनावरांच्या मालकाना नुकसान भरपाई देय होत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.